


पुण्यातील एका गीतरामायण कार्यक्रमाची रक्कम स्वातंत्र्यवीर सावरकरांना अर्पण केल्यानंतर बसलेले (डावीकडून) - सुंदराताई भोपटकर, स्वा. सावरकर, सौ. माई सावरकर, सौ. ललिता फडके, सौ. साठे, श्रीधर फडके (मागे उभा). उभे (डावीकडून) - नाना आपटे, डॉ. शि. न. साठे, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके.



# प्रथम तुज पाहता...

● 'हमको तुम्हारा ही आसरा तुम हमारे हो न हो' (साजन), 'मोरे राजा हो ले चल नदिया के पार' (नदिया के पार) सारखी लोकप्रिय गाणी गाणारी गायिका ललिता देऊळकर व सुधीर फडके २९ मे १९४९ रोजी विवाहबद्ध झाले. लग्नात सुप्रसिद्ध पार्श्वगायक महंमद रफी यांनी मंगलाष्टकं म्हटली. विवाहानंतर ललिताबाईंनी आपणहून पार्श्वगायन न करण्याचा निर्णय घेतला. 'मोठं मोठं डोळं तुझं कोळ्याचं जाळं' (जशास तसे १९५१), 'मी तर प्रेम दिवाणी' (सुवासिनी) अशी काही गाणी अपवादात्मकपणे ललिताबाईंनी म्हटली आहेत. त्यांचा उत्तराधिकारी गायक, संगीतकार पुत्र श्रीधर फडके यांनी मात्र नितांत श्रवणीय कामगिरी पुढे चालू ठेवली असून 'फिटे अंधाराचे जाळे,' 'ऋतु हिरवा,' 'ओंकार स्वरूपा' 'तू माझ्या आयुष्याची पहाट' इत्यादी लोकप्रिय गाण्यांसाठी ते प्रसिद्ध आहेत. ■



कुटुंबासमवेत बाबूजी



